# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

## मा.स्थायी समिती

**कार्यपत्रिका क्रमांक – ३४**

**(सभावृत्तांत)**

दिनांक – ०८/११/२०१७ वेळ – दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा बुधवार, दिनांक ०८/११/२०१७ रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा.सावळे सिमा रविंद्र - सभापती
२) मा.उत्तम प्रकाश केंदळे
३) मा.मुंढे उषा अंकुश
४) मा.माधुरी कुलकर्णी उर्फ मोनाताई
५) मा.हर्षल मच्छिंद्र ढोरे
६) मा.कुटे निर्मला संजय
७) मा.आशा धायगुडे-शेंडगे
८) मा.गोफणे अनुराधा देविदास
९) मा.वैशाली जालिंदर काळभोर
१०) मा.मोरेश्वर महादू भोंडवे
११) मा.राजू मिसाळ
१२) मा.अमित राजेंद्र गावडे
१३) मा.कैलास उर्फ बाबा भालचंद्र बारणे

याशिवाय मा.श्रावण हर्डीकर-आयुक्त,मा.उल्हास जगताप-नगरसचिव, मा.तळदेकर-मुख्य लेखापरिक्षक,मा.चव्हाण-शहर अभियंता,मा.डॉ.अनिल रॉय–आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा.ठाकूर-उपसंचालक नगररचना, मा.पाटील, मा.तुपे, मा.दुधेकर, मा.पठाण–सहशहर अभियंता, मा.डोईफोडे, मा.कडूसकर,मा.दुरगुडे,मा.आष्टीकर,मा.लोणकर,मा.बोदडे,मा.खोराटे,मा.खोत,मा.बहुरे,मा.राऊत,मा.दांगट -सहाय्यक आयुक्त,मा.पवार-प्र.कायदा सल्लागार,मा.साळुंके-मुख्य उद्यान अधिक्षक,मा.पाटील-प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण केंद्र,मा.आवारी-प्रशासन अधिकारी (शिक्षणमंडळ),मा.पोमण-मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी,मा.सवणे,मा.इंगळे,मा.तांबे,मा.चव्हाण,मा.थोरात,मा.लडकत,मा.कुलकर्णी,मा.जुंधारे, मा.गलबले,मा.घोडे,मा.कांबळे,मा.ओंभासे,मा.गट्टूवार,मा.पुजारी,मा.गायकवाड,मा.भोसले,मा.मोरे, मा.पाटील,मा.घुबे,मा.देशमुख-कार्यकारी अभियंता, मा.डॉ.गोरे-पशुवैद्यकीय अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-------------

**<u>उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करून घेणेत आले –</u>**

| | |
|---|---|
| विषय क्रमांक २३) | पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील मौजे पिंपळे गुरव, पिंपळे सौदागर व मौजे सांगवी पर्यंत संरक्षण विभागाच्या हद्दीलगत असलेल्या मंजूर विकास योजनेतील १२ मी. रस्त्यालगत संरक्षण विभागाच्या हद्दीमध्ये अतिरिक्त १२ मी. रुंद रस्ता व इतर अनुषंगिक रस्ते प्रस्तावित करणे व सदरची जागा संरक्षण विभागाकडे मागणी करणेबाबत... |
| विषय क्रमांक २४) | क,ड व ई क्षेत्रीय कार्यालयाचे परिसरातील मैलाशुद्धीकरण केंद्रातील स्लजची वाहतूक करणेबाबत... |
| विषय क्रमांक २५) | पंतप्रधान आवास योजनेसाठी मे.M.M.Project Consultants Pvt. Ltd. यांची आर्किटेक्ट सल्लागार व प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार नेमणूकीबाबत... |
| विषय क्रमांक २६) | मा.महानगरपालिका सभा दि.१६/१०/२०१७ च्या सभेमधील ठ.क्र.९७ मधील मा.नगरसदस्य यांनी केलेल्या उपसूचनांद्वारे मंजूर प्रशासकीय कामासाठी वाढ/घट करणेबाबत... |
| विषय क्रमांक २७) | श्री.दुर्गाजी शंकर लोखंडे यांना घंटागाडी ठेकेदार नियुक्तीबाबत.. |
| विषय क्रमांक २८) | प्रभाग क्र.११ मधील पूर्णानगर येथिल से.क्र.१८ सीडीसी मधील मोकळी जागा क्र.४ विकसित करणेसाठी वास्तुविशारदाची नेमणूक करणेबाबत – मा.उत्तम केंदळे, मा.कैलास बारणे यांचा प्रस्ताव... |
| विषय क्रमांक २९) | क क्षेत्रीय कार्यक्षेत्रातील जुना प्रभाग क्र.६ व नविन प्रभाग क्र.२ मधील कामासाठी वास्तुविशारद व अभियांत्रिकी सल्लागार नेमणूक करणेबाबत – मा.कैलास बारणे, मा.उत्तम केंदळे यांचा प्रस्ताव... |
| विषय क्रमांक ३०) | प्रभाग क्र.३१ मधील विविध रस्त्याच्या कामांना सल्लागार नेमणेबाबत – मा.अमित गावडे, मा.माधुरी कुलकर्णी यांचा प्रस्ताव... |
| विषय क्रमांक ३१) | पिंपरी चिंचवड जिल्हास्तरीय महापौर चषक अर्ध मॅरेथॉन स्पर्धा घेणेबाबत- मा.निर्मला कुटे, मा.अनुराधा गोफणे यांचा प्रस्ताव... |
| विषय क्रमांक ३२) | मे.लक्ष्मी इन्स्टिट्युट ऑफ ऍनिमल वेलफेअर, अमरावती यांची बेवारस कुत्र्यांचे निर्बीजीकरण करणेकामी निविदेनुसार प्राप्त झालेल्या दरानुसार नेमणूकीबाबत – मा.उषा मुंढे, मा.अनुराधा गोफणे यांचा प्रस्ताव... |
| विषय क्रमांक ३३) | महानगरपालिकेच्या अखत्यारीतील यमुनानगर येथील वाचनालय कुलस्वामिनी महिला संघ या संस्थेस चालविणेस देणेबाबत – मा.उत्तम केंदळे, मा.आशा धायगुडे-शेंडगे यांचा प्रस्ताव... |
| विषय क्रमांक ३४) | तासिका तत्वावर कार्यरत असणा-या शिक्षकांना मानधन वाढविणेबाबत – मा.कैलास बारणे, मा.आशा धायगुडे-शेंडगे यांचा प्रस्ताव... |
| विषय क्रमांक ३५) | प्राधिकरणाकडून हस्तांतरीत झालेले क्रीडा संकुलाबाबत - मा.उषा मुंढे, मा.आशा धायगुडे-शेंडगे यांचा प्रस्ताव... |

विषय क्रमांक ३६) प्रभाग क्र.६ येथील मोशी-आळंदी रस्ता-गायरान रस्ता-कुदळेवस्ती-आरक्षण क्र.१/२१४ ते आळंदी रस्त्यापर्यंत विकास आराखड्यातील रस्ता विकसित करणे (गट क्र.३६३ ते २५१)-मा.हर्षल ढोरे, मा.वैशाली काळभोर यांचा प्रस्ताव...

------------

अ) दिनांक २५/१०/२०१७ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक ३२) चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

ब) दिनांक ०१/११/२०१७ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक ३३) चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

-----------

**निर्णय–१) <u>शहरातील अपु-या होत असलेल्या पाणीपुरवठ्याबाबत</u>** –

अ) सर्व सन्मा.सदस्यांनी शहरात होत असलेल्या अपु-या पाणीपुरवठ्याबाबत तक्रार मांडली आहे. शहरातील पाणीपुरवठ्याचा विस्कळीतपणा खूप गंभीर समस्या आहे. त्यामुळे प्रथम ज्या-ज्या ठिकाणी अनधिकृत नळजोड आहेत ते कट करावेत. व संबंधितांवर गुन्हे दाखल करावेत.

आ) ज्या-ज्या अधिका-यांनी अनधिकृत नळजोड होत असताना त्याकडे दूर्लक्ष केले आहे, त्यांच्यावर प्रशासनाकडून कारवाई करणेत यावी.

इ) मा.दूधेकर,सह शहर अभियंता आपणास आदेश आहेत की, शहरात काही ठिकाणी बोअरवेल, हापसे काढून दिले आहेत, ते दुरुस्त करावेत. सार्वजनिक नळांना कोंडाळे नसतील तर ते बसवा किंवा ते नळजोड बंद करावेत.

ई) दररोज सलग पाणीपुरवठा देऊ शकत नाही असे असेलतर दिवसाआड परंतू प्रेशरने पाणीपुरवठा करावा. त्यासाठी पुन्हा एकदा सर्वपक्षीय बैठक बोलवून त्यावर तोडगा काढावा.

उ) अनधिकृत नळकोंडाळे,एक/दोन इंची नळजोड किती घेतले आहेत, याबाबत शहरातील सर्व मोठमोठ्या शैक्षणिक संस्था/संकुले, औद्योगिक/व्यावसायिक संकुले/परिसर, हॉटेल्स,सर्व (खाजगीसह) रुग्णालये, शाळा, महाविद्यालये, वॉशिंग सेंटर्स, यांची तपासणी करावी. व अनधिकृत कनेक्शन्स आढळल्यास ते कट करुन संबंधितांवर गुन्हा दाखल करावा. मीटर निरीक्षक यांनी पाण्याचे बील वाटप करतानाच सर्व कनेक्शन्सची तपासणी करावी.

ऊ) अनधिकृत नळजोड कळविणेबाबत लोकांना आवाहन करावे, ऑडीओ क्लिपद्वारे जनजागृती करावी. येत्या १५ दिवसांत फक्त निवासीसाठी अनधिकृत नळजोड अधिकृत करण्यासाठी अभय योजना जाहीर करावी.

२) **<u>अनधिकृत फेरीवाले, अतिक्रमणाबाबत –</u>**

अ) नाशिक फाटा येथे जो रेल्वे लाईनला लागून नवीन रॅम्प करतोय,त्या रॅम्पच्या खालील जागेत मिठाईचे मोठे दूकान चालू झाले आहे. त्यामुळे वाहनांना जाण्यायेण्यासाठी अडचण होते आहे. रॅम्पच्या दोन्ही बाजूंना जाळी टाकावी.

ब) कासारवाडीला मेट्रोसाठी पोल टाकायचे काम चालू आहे. ग्रेडसेपरेटर बंद झाला आहे. त्यामुळे दररोज सर्वीस रोडला वाहतूक कोंडी होते आहे. सर्वीस रोडवर वाहतूकीचा ताण येतो आहे. मेट्रोचे काम शक्यतो रात्रीच्या वेळी करावे. रिफ्लेक्टर्स लावले पाहीजेत.

क) नाशिक फाटा इथे इंडीया शोरूमच्या बाजूने गाड्या लावलेल्या असतात. बालाजीनगरमध्ये टोटोटोचे शोरूम आहे. पुण्यातील डीएसके यांचे शोरुम बंद झाल्यामुळे त्यांच्या सगळ्या गाड्या इकडे आल्या आहेत. गाड्या रस्त्यावर लावल्या असल्यामुळे सिंगलसुद्धा गाडी जाऊ शकत नाही. वाहतूक कोंडी होत असते. आरटीओ यांना याबाबत कळवावे. तसेच महापालिकेकडूनही या शोरूमवर कारवाई करण्यात यावी. टेल्को रोडला हेवी ट्रॅफीक जाम असते. त्यामुळे तिथून इंद्रायणीनगरपासून लांडेवस्तीपर्यंत ट्रॅफिक जाम होते. त्यामुळे या दोन/तीन ठिकाणी ताबडतोब कारवाई करण्यात यावी.

इ) शहरात जितके उड्डाणपूल आहेत, त्या पूलांखाली तसेच महापालिकेच्या इमारतीसमोरील हिरवळीवर देखील भिकारी मोठ्या प्रमाणात येऊन बसलेले दिसत आहेत. यावर त्वरित कारवाई करून नियंत्रण आणावे. स्पाईन रोड फ्लायओव्हर खालील जाळ्या काढून नेल्या आहेत. तिथे रात्रंदिवस पत्ते खेळणे, दारु पिऊन धिंगाणा घालायचे काम चाललेले असते. त्याचा त्रास आजूबाजूच्या सोसायट्यांमधील रहिवाशांना होतो आहे. अशा लोकांवर दया दाखवली नाही पाहीजे. शहराचे सुशोभिकरण करतो तर त्याची देखभाल/काळजी देखील घेतली पाहीजे.

-------------

| | |
|---|---|
| ठराव क्रमांक –१२४१ | विषय क्रमांक – १ |
| दिनांक – ०८/११/२०१७ | विभाग–मध्यवर्ती साहित्य भांडार (वैद्यकिय) |
| सूचक – मा.उत्तम केंदळे | अनुमोदक – मा.उषा मुंढे |

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.मसाभां/कावि/४/२००/२०१७ दि.५/१०/२०१७

विषय - हेल्थ कार्ड मॅनेजमेंट सिस्टिमचे वार्षिक देखभाल दुरुस्तीकामी (ओपीडी व आयपीडी सह) येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत...

विषय क्रमांक १ दप्तरी दाखल करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**निर्णय- १)** मे.अमृता टेक्नॉलॉजी यांनी तयार केलेल्या हेल्थ कार्ड मॅनेजमेंट सिस्टिमचा सोर्सकोड, आयपीआर,डेटा त्यांच्याकडे आहे तो मिळवावा. अशाप्रकारे एखाद्या संस्थेला कायमस्वरुपी काम देणे, अशा प्रकारची मंजूरी दिली जाणार नाही. स्थायी समिती अशा प्रकारे महापालिकेला वेठीस धरण्याचे, ब्लॅकमेलिंग करण्याचे काम चालू देणार नाही. इतर विभागांत अशा प्रकारची कामे दिलेली असतील तर त्यांनी देखील याबाबतीत सावधानता बाळगावी. महापालिका कोणालाही कायमस्वरुपी अशा प्रकारचे काम देऊ शकत नाही.

**२)** प्रशासन विभागाला आदेश आहेत की,ई-गव्हर्नन्स विभागातील माहिती व तंत्रज्ञान अधिकारी श्री.एस.एस.पवार यांची या विभागातून ताबडतोब बदली करणेत यावी. मा.मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी यांचे विभागावर नियंत्रण नाही. विभागप्रमुख इतके हतबल

असतील तर त्यांनी कारवाईस सामोरे जावे. पुढील आठवड्यात तुमचा विषय नील झालेला दिसला नाहीतर कारवाईस सामोरे जावे लागेल.

**३)** या विषयातील लोकल त्रुटी तपासाव्यात. महापालिका ही संस्था म्हणून या संस्थेवर जी काही कारवाई करता येईल ती प्रशासनाने करावी. या ठेकेदाराला ब्लॅकलिस्ट करा. आख्या देशात कुठेही त्यांना काम करता आले नाही पाहीजे अशी पण त्यांची सोय करा. अशा प्रकारची फसवणूक सहन केली जाणार नाही.

**४)** या विषयाला पाच वर्षे कालावधीसाठी मंजूरी देण्यात येणार नाही. हा विषय फेटाळण्यात येतो आहे.

----------

ठराव क्रमांक –१२४२ विषय क्रमांक – २

दिनांक – ०८/११/२०१७ विभाग– पाणीपुरवठा

सूचक – मा.माधुरी कुलकर्णी अनुमोदक – मा.हर्षल ढोरे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.पापु/मुख्य/९०३/२०१७ दि.३०/१०/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

ब मुख्यालय अंतर्गत सन २०१५-१६ साठी जलक्षेत्र क्र.बी/३ व ५ ते ८ अंतर्गत व्हॉल्व ऑपरेशन करणेकामी मजूर कर्मचारी पुरविणे कामाची निविदा रक्कम रु.९७,९८,१०१/- एवढी असून या कामाचे आदेश दि.१/१२/२०१६ रोजीच्या आदेशान्वये देणेत आलेले आहेत. या कामाची मुदत दि.३०/११/२०१७ पर्यंत आहे. परंतु GST लागू झाल्यामुळे निविदा प्रक्रियेस विलंब झालेला आहे. सदर काम हे पाणीपुरवठ्याचे अत्यावश्यक काम आहे. नवीन कामाची निविदा प्रक्रीया होऊन प्रत्यक्ष कामाचे आदेश देईपर्यंत सदर कामास दि.३१/१२/२०१७ पर्यंत वाढीव खर्च र.रू.८,२५,०८१/- सह र.रु.१,०६,२३,१८२/- चे सुधारित खर्चासह मुदतवाढ देणेस तसेच सदरचे काम अंदाजपत्रकीय पान क्र.८६४, अनु. क्र.५१ मधुन व तरतूदीमधुन करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१२४३ विषय क्रमांक – ३

दिनांक – ०८/११/२०१७ विभाग– पाणीपुरवठा

सूचक – मा.निर्मला कुटे अनुमोदक – मा.आशा धायगुडे-शेंडगे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.पापु/मुख्य/९०६/२०१७ दि.३०/१०/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

जलक्षेत्र क्र.ड/१ ते ८ पाण्याच्या टाकीवरील वितरण व्यवस्थेसाठी ठेकेदारी पध्दतीने मजूर पुरविणे कामास दि.31/12/2017 पर्यंत र.रु.61,64,946/- सुधारीत खर्चासह मान्यता मिळालेली आहे. तथापि ठरावाखाली निर्णयामध्ये सदर कामास दि.31/10/2017 पर्यंत मुदतवाढ मंजुर केलेली आहे. सदर कामासाठी नवीन निविदेची कार्यवाही चालु असून त्यास काही कालावधी लागणार आहे. सदर काम हे पाणीपुरवठ्याचे अत्यावश्यक काम आहे. नवीन कामाची निविदा प्रक्रीया होऊन प्रत्यक्ष कामाचे आदेश देईपर्यंत सदर कामच चालु ठेवावे लागणार आहे. सबब, सदर कामास दि.31/12/2017 पर्यंत पूर्वमान्य असलेल्या र.रु.61,64,946/- च्या सुधारीत

खर्चासह मुदतवाढ देणेस तसेच सदरचे काम अंदाजपत्रकातील पान क्र.869 अनु.क्र.12 मधुन व तरतूदीमधुन करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१२४४ विषय क्रमांक – ४

दिनांक – ०८/११/२०१७ विभाग– पाणीपुरवठा

सूचक – मा.अनुराधा गोफणे अनुमोदक – मा.वैशाली काळभोर

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.पापु/मुख्य/९०४/२०१७ दि.३०/१०/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

सन २०१५-१६ करिता जलक्षेत्र क्र. ड/९ ते १५ पाण्याच्या टाकीवरील वितरण व्यवस्थेसाठी ठेकेदारी पध्दतीने मजूर पुरविणेकामी मुदतवाढ व वाढीव खर्च या कामास दि.31/12/2017 पर्यंत र.रु.97,70,025/- सुधारीत खर्चासह मान्यता मिळालेली आहे. तथापि ठरावाखाली निर्णयामध्ये सदर कामास दि.31/10/2017 पर्यंत मुदतवाढ मंजुर केलेली आहे. सदर कामासाठी नवीन निविदेची कार्यवाही चालु असून त्यास काही कालावधी लागणार आहे. सदर काम हे पाणीपुरवठ्याचे अत्यावश्यक काम आहे. नवीन कामाची निविदा प्रक्रीया होऊन प्रत्यक्ष कामाचे आदेश देईपर्यंत सदर कामच चालु ठेवावे लागणार असल्याने सदर कामास दि.31/12/2017 पर्यंत पूर्वमान्य असलेल्या र.रू.97,70,025/- च्या सुधारीत खर्चासह मुदतवाढ देणेस तसेच सदरचे काम अंदाजपत्रकातील पान क्र.871 अनु.क्र.2 मधुन व तरतूदीमधुन करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१२४५ विषय क्रमांक – ५

दिनांक – ०८/११/२०१७ विभाग– पाणीपुरवठा

सूचक – मा.मोरेश्वर भोंडवे अनुमोदक – मा.राजू मिसाळ

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.पापु/मुख्य/९०५/२०१७ दि.३०/१०/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

जलक्षेत्र क्र.ड/१,२,३,४ अंतर्गत व्हॉल्व ऑपरेशन करणेकामी मजुर कर्मचारी पुरविणेकामी मा.स्थायी समिती ठराव क्र.७२८ दिनांक २/८/२०१७ अन्वये दि.31/12/2017 पर्यंत र.रु.1,12,59,034/- सुधारीत खर्चासह मान्यता मिळालेली आहे. तथापि, ठरावाखाली निर्णयामध्ये सदर कामास दि.31/10/2017 पर्यंत मुदतवाढ मंजुर केलेली आहे. सदर कामासाठी नवीन निविदेची कार्यवाही चालु असून त्यास काही कालावधी लागणार आहे. सदर काम हे पाणीपुरवठ्याचे अत्यावश्यक काम आहे. नवीन कामाची निविदा प्रक्रीया होऊन प्रत्यक्ष कामाचे आदेश देईपर्यंत सदर कामच चालु ठेवावे लागणार असल्याने सदर कामास दि.31/12/2017 पर्यंत पूर्वमान्य असलेल्या र.रु.1,12,59,034/- च्या सुधारीत खर्चा सह मुदतवाढ देणेस तसेच सदरचे काम अंदाजपत्रकातील पान क्र.865 अनु.क्र.81 मधुन व तरतूदीमधुन करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक –१२४६ विषय क्रमांक – ६
दिनांक – ०८/११/२०१७ विभाग–पाणीपुरवठा,ब.क्षे.का.
सूचक – मा.अमित गावडे अनुमोदक – मा.कैलास बारणे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.पापु/बक्षेका/६४५५/८५/२०१७ दि.३०/१०/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

प्रस्तावात नमूदप्रमाणे उप कार्यकारी अभियंता, खडकवासला पाटबंधारे विभाग, पुणे यांनी अनामत ठेव रकमेवर पवना नदीवर मौजे शिवणे व मौजे गहुंजे ता.मावळ, जि.पुणे येथील प्रस्तावित को.प. बंधा-याबाबत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडून उपलब्ध होणा-या अनामत ठेव रकमेतुन नवीन बंधारे महाराष्ट्र जलसंपत्ती नियामक प्राधिकरणाने दिलेल्या निर्णयाप्रमाणे बांधणे प्रस्तावित असलेबाबत कळविले आहे. त्याअनुषंगाने अंदाजपत्रकात Core Logging हे भूगर्भ शास्त्रज्ञांकडून तपासून घेणेकामी र.रु.९,०८,६००/- इतकी रक्कम अदा करणेविषयी कळविले आहे. जेणेकरुन पुढील कार्यवाही करणे सुलभ होईल. सन २०१७-१८ च्या अंदाजपत्रकात पाणीपुरवठा टप्पा-१ जे.एन.एन.यु.आर.एम. या लेखाशिर्षाअंतर्गत (पान क्र.६६७, अ.क्र.४ वर) पवना नदीवर मौजे शिवणे व मौजे गहुंजे येथे कोल्हापुर पद्धतीचा बंधारा बांधणेकामी र.रु.१०,००,००,०००/- एवढी तरतूद करणेत आलेली आहे. तरी अनामत ठेव रकमेवर पवना नदीवर मौजे शिवणे व मौजे गहुंजे, ता.मावळ, जि.पुणे येथील प्रस्तावित कोल्हापुर पद्धतीच्या बंधा-यासाठीच्या भूशास्त्रीय कामासाठी र.रु.९,०८,६००/- पाटबंधारे विभागास देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१२४७ विषय क्रमांक – ७
दिनांक – ०८/११/२०१७ विभाग– मध्यवर्ती साहित्य भांडार (वैद्यकिय)
सूचक – मा.माधुरी कुलकर्णी अनुमोदक – मा.अमित गावडे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.मसाभां/कावि/४/२२७/२०१७ दि.३१/१०/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेवून –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या यशंवतराव चव्हाण स्मृती रूग्णालयामध्ये नागरिकांना उपचार घेणेकामी हेल्थ कार्ड योजना कार्यान्वित करण्यात आलेली आहे.सदरची सेवा संपूर्णत: ऑनलाईन करण्यात आलेली आहे. सदर यंत्रणेचे दुरूस्ती व देखभालीचे कामकाज सद्यस्थितीत मे.अमृता टेक्नॉलॉजी यांचेकडे आहे. सदर कामकाजाची मुदत दि.१४.०७.१७ रोजी संपत असलेकारणाने पुढील कामकाज आदेश होईपर्यंत तीन महिन्याची मुदतवाढ मा.स्थायी समिती ठराव क्रं.७०४ दि.२६.०७.१७ अन्वये देण्यात आलेली होती त्यानुसार त्याचा वाढीव कामकाजाचा कालावधी दि.१४.१०.१७ रोजी संपलेला आहे. सदरचे कामकाजा बाबतचे विषयपत्र मा.स्थायी समिती समोर ठेवण्यात आलेले असून त्यावर अद्याप निर्णय झालेला नाही सबब मे.अमृता टेक्नॉलॉजी यांचेकडून दि.१५.१०.२०१७ पासून पुढील कार्यादेश होईपर्यंत हेल्थ कार्ड मॅनेजमेंट सिस्टिमचे वार्षिक देखभाल दुरुस्ती कामकाज मागील करारनाम्यास अधिन राहून करून घेणेकामी तसेच याकामी येणा-या खर्चास र.रु.२९,९९,५१४/- प्रति त्रैमासिक म्हणजेच

प्रति महिन्यास र.रू.९,९९,८३८/-याप्रमाणे अदा करणेस तसेच येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेची मा.आयुक्त यांची मागणी असलीतरी प्रस्तुत विषयातील कामास दि.१५/१०/२०१७ पासुन दि.३१/०१/२०१८ पर्यंत मुदतवाढ देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**निर्णय** – तीन महिने मुदतवाढ देण्यात येत आहे. तीन महिन्यांत सगळी कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करावी.

----------

ठराव क्रमांक –१२४८ विषय क्रमांक – ८

दिनांक – ०८/११/२०१७ विभाग– मध्यवर्ती साहित्य भांडार (वैद्यकिय)

सूचक – मा.हर्षल ढोरे अनुमोदक – मा.निर्मला कुटे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.मसाभां/कावि/४/२२६/२०१७ दि.३१/१०/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेवून –

पिंपरी चिंचवड मनपाच्या वाय.सी.एम. रुग्णालयातील एम.आर.आय. सेंटर मे.रुबी एलकेअर यांना दि.९/५/२०११ पासून ५ वर्षे कालावधीसाठी CGHS च्या (-) २७% दराने without contrast व with contrast MRI करुन देणेकामी करारनामा करुन कामाचे आदेश निर्गत करणेत आले होते. सदर करारनाम्याची मुदत संपत आली असलेने तसेच नवीन जादा क्षमतेचे MRI मशिन निविदा प्रक्रियेद्वारे खरेदी करणेकामी लागणारा कालावधी विचारात घेता मे.रुबी एलकेअर यांना दि.०८/११/२०१७ पासून पुढील कार्यादेश होईपर्यंत पूर्वीच्या करारनाम्यास अधिन राहून मुदतवाढ देणेची मा.आयुक्त यांची मागणी असली तरी प्रस्तुत विषयातील कामास दि.०८/११/२०१७ पासुन दि.०७/०२/२०१८ पर्यंत मुदतवाढ देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१२४९ विषय क्रमांक – ९

दिनांक – ०८/११/२०१७ विभाग– स्थापत्य अ मुख्यालय

सूचक – मा.उत्तम केंदळे अनुमोदक – मा.उषा मुंढे

संदर्भ – मा.शहर अभियंता यांचे जावक क्र.स्था/नि/अ-मुख्य/५६२/१७ दि.३०/१०/२०१७

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.१०/३६/२०१७-१८ अन्वये प्रभाग क्र.१८ अंतर्गत मनपा इमारतीची स्थापत्य विषयक कामे करणेकामी M/s.Motwani & Sons नि.र.रु.१९,६०,७०४/- (अक्षरी र.रू.एकोणीस लाख साठ हजार सातशे चार फक्त) पेक्षा १५.५०% कमी या ठेकेदाराकडुन निविदा मंजुर दराने र.रु १६,५६,७९५/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार करारनामा करुन कामाचे आदेश निर्गत केले असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१२५०
विषय क्रमांक – १०
दिनांक – ०८/११/२०१७
विभाग– पर्यावरण अभियांत्रिकी
सूचक – मा.माधुरी कुलकर्णी
अनुमोदक – मा.हर्षल ढोरे
संदर्भ – मा.सहशहर अभियंता यांचे जावक क्र.पअक/१/कावि/६६२/२०१७ दि.३१/१०/२०१७

मा.सहशहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पर्यावरण अभियांत्रिकी विभागाकडील नि.नो.क्र.ENV7/9-2016-17 मधील मनपा कार्यक्षेत्रात पर्यावरण जनजागृतीकामी आवश्यकतेप्रमाणे साईन बोर्ड माहिती फलक व भिती रंगविणेचे कामे करणेकामी मे.ओम एंटरप्रायझेस यांचेकडून (नि.र.रू.७,४७,९४५/-) -३.००% कमी या सुधारित दराने करून घेणेकामी त्यांचेसोबत करारनामा करून कामाचे आदेश देण्यात आले असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१२५१
विषय क्रमांक – ११
दिनांक – ०८/११/२०१७
विभाग– उद्यान
सूचक – मा.निर्मला कुटे
अनुमोदक – मा.आशा धायगुडे-शेंडगे
संदर्भ – मा.अति.आयुक्त यांचे जावक क्र.उद्यान/४/कावि/३४३/२०१७ दि.२०/०८/२०१७

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपा उदयान विभागाकडील कोटेशन नोटीस क्र.वृक्ष ४/२०१७-१८ अन्वये दुर्गादेवी उद्यानातील झाडांचे खोडे काढणे, खड्डे खोदणे व रस्ता तयार करणेकामी EX 70 पोकलेन भाड्याने घेणे व पोकलेन वहातुक करणेबाबतचे कामकाज मे.क्राफ्ट कार्पोरेशन लि.यांचे कोटेशन नोटीस अंदाजपत्रकिय दर.रू.१,९४,०००/- (अक्षरी र.रू.एक लाख चौ-यान्नव हजार फक्त) अंदाजपत्रकिय दरापेक्षा १५% ने कमी (र.रू.१,६४,९००/-) या दराचे कोटेशन स्वीकृत करणेत आले असून आदेश उदयान/४/कावि/३४२/२०१७ दि.१९/०९/२०१७ अन्वये कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१२५२
विषय क्रमांक – १२
दिनांक – ०८/११/२०१७
विभाग– मुख्यलेखापरिक्षण
सूचक – मा.अनुराधा गोफणे
अनुमोदक – मा.वैशाली काळभोर
संदर्भ – मा.मुख्यलेखापरिक्षक यांचे जावक क्र.मुलेप/६/कावि/१९३/२०१७ दि.०२/११/२०१७

महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५(१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.२३.१०.२०१७ ते दि. २९.१०.२०१७ अखेर संपणा-या आठवड्याचा मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी क्र.मुलेप/६/कावि/१९३/२०१७ दि.०२.११.२०१७ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१२५३ विषय क्रमांक – १३

दिनांक – ०८/११/२०१७ विभाग– मुख्यलेखापरिक्षण

सूचक – मा.मोरेश्वर भोंडवे अनुमोदक – मा.राजू मिसाळ

संदर्भ – मा.मुख्यलेखापरिक्षक यांचे जावक क्र.मुलेप/६/कावि/१९२/२०१७ दि.०२/११/२०१७

महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५(१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि. १६.१०.२०१७ ते दि. २२.१०.२०१७ अखेर संपणा-या आठवड्याचा मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी क्र.मुलेप/६/कावि/१९२/२०१७ दि.०२.११.२०१७ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१२५४ विषय क्रमांक – १४

दिनांक – ०८/११/२०१७ विभाग– मुख्यलेखापरिक्षण

सूचक – मा.अमित गावडे अनुमोदक – मा.कैलास बारणे

संदर्भ – मा.मुख्यलेखापरिक्षक यांचे जावक क्र.मुलेप/१/कावि/१०१४/२०१७ दि.०३/११/२०१७

मुख्य लेखा परिक्षण विभागामध्ये कार्यरत असणा-या कर्मचा-यांनी रजा मंजुरी कामी सादर केलेल्या विनंती अर्जानुसार प्रस्तावात नमूद प्रपत्र अ मध्ये दर्शविले प्रमाणे रजा मंजुरीस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१२५५ विषय क्रमांक – १५

दिनांक – ०८/११/२०१७ विभाग– क्रीडा

सूचक – मा.उत्तम केंदळे अनुमोदक – मा.उषा मुंढे

संदर्भ – १) मा.अति.आयुक्त यांचे जावक क्र.क्रीडा/७/कावि/२२३/२०१७ दि.१९/०९/२०१७

२) मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती, ठराव क्रमांक ६३,
दिनांक ३०/१०/२०१७ अन्वये

कु.नुपुर लक्ष्मण मोरे,निगडी,पुणे-४४ हीने ७ वी एशियन योगा स्पोर्टस चॅम्पियनशीप २०१७ सिंगापूर या स्पर्धेस जाऊन आल्याने तिने याकामी स्पर्धा खर्च योगा फेडरेशन ऑफ इंडिया या संस्थेस र.रु.७०,०००/- स्वत: दिल्याने मनपा नियमानुसार रक्कम रुपये ७०,०००/- च्या ७५% रक्कम रु.५२,५००/- (अक्षरी र.रु.बावन्न हजार पाचशे फक्त) आर्थिक सहाय्य अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१२५६ विषय क्रमांक – १६

दिनांक – ०८/११/२०१७ विभाग– क्रीडा

सूचक – मा.माधुरी कुलकर्णी अनुमोदक – मा.हर्षल ढोरे

संदर्भ – १) मा.अति.आयुक्त यांचे जावक क्र.क्रीडा/७/कावि/२२४/२०१७ दि.१९/०९/२०१७

२) मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती, ठराव क्रमांक ६४, दिनांक

३०/१०/२०१७ अन्वये

सौ.रुपाली गणेश तरवडे,चिंचवड,पुणे-३३ यांनी ७वी एशियन योगा स्पोर्टस चॅम्पियनशीप २०१७ सिंगापूर या स्पर्धेस जाऊन आल्याने तिने याकामी स्पर्धा खर्च योगा फेडरेशन ऑफ इंडिया या संस्थेस र.रु.७०,०००/- स्वत: दिल्याने मनपा नियमानुसार रक्कम रुपये ७०,०००/- च्या ७५% रक्कम रु.५२,५००/- (अक्षरी र.रु.बावन्न हजार पाचशे फक्त) आर्थिक सहाय्य करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१२५७ विषय क्रमांक – १७

दिनांक – ०८/११/२०१७

सूचक – मा.निर्मला कुटे अनुमोदक – मा.आशा धायगुडे-शेंडगे

संदर्भ – १) मा.सागर गवळी, मा.शैलेंद्र मोरे यांचा प्रस्ताव,

२) मा.शहर सुधारणा समिती, ठराव क्रमांक २८, दिनांक ३१/१०/२०१७ अन्वये

विषय- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नागरवस्ती विकास योजना विभागाकडील मागासवर्गीय कल्याणकारी योजनेअंतर्गत प्रशिक्षणांचे आयोजन करण्यास व त्याकरिता येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेबाबत...

विषय क्रमांक १७ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१२५८ विषय क्रमांक – १८

दिनांक – ०८/११/२०१७ विभाग– उद्यान/वृक्षसंवर्धन

सूचक – मा.अनुराधा गोफणे अनुमोदक – मा.वैशाली काळभोर

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.उद्यान/४/कावि/३९७/२०१७ दि.३/११/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाचे उदयान विभागाकडील निविदा नोटीस क्र.२/२०१७-१८ वृक्षारोपणासाठी मोठी रोपे पुरविणे व लागवड करून ०१ वर्षे देखभाल करणे बाबत मे.न्यू गार्डन गुरूज् फार्म अँन्ड नर्सरी या ठेकेदाराची निविदा अंदाजपत्रकिय दरापेक्षा (- ६.१० टक्के ने कमी) ही सर्वात कमी दराची निविदा स्विकृत करून कामाचा आदेश देऊन काम पुर्ण करणेत झाले असुन सन २०१७-१८ चे वृक्षारोपणाचे उद्दीष्ट पुर्ततेसाठी वाढीव ३००० रोपांची आवश्यकता असुन महाराष्ट्र शासन उद्योग, उर्जा, कामगार विभागाचे पुनर्प्रत्ययी आदेशाचे अनुषंगाने मार्गदर्शकतत्वानुसार तसेच या संबंधी खरेदी/निविदा समितीची मान्यता विचारात घेता पुनर्प्रत्ययी आदेश देऊन मे.न्यू गार्डन गुरूस फार्म अँन्ड नर्सरी यांना वाढीव 3000 मोठी रोपे पुरविणे व लागवड करून ०१ वर्ष कालावधीसाठी काम करणेस मान्यता मिळालेली असुन करारनामा करून काम करून घेणेस व त्यासाठीचे प्रशासकिय व येणारे प्रत्यक्ष र.रू.७६,५९,२८२/- (अक्षरी र.रू.शहात्तर लाख एकोणसाठ हजार दोनशे ब्याऐंशी फक्त) चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१२५९ विषय क्रमांक – १९

दिनांक – ०८/११/२०१७ विभाग– उद्यान

सूचक – मा.मोरेश्वर भोंडवे अनुमोदक – मा.राजू मिसाळ

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.उद्यान/४/कावि/३९६/२०१७ दि.३/११/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिका अधिकारातील सर्व जमिनीवरील वृक्षांची गणना करणेकामी जीआयएस + इमेज सर्व्हर अप्लिकेशन लायसन्स पुरविणे, जीआयएस सर्व्हर हार्डवेअर, डेस्कटॉप २ नग, सॅटेलाईट ईमेज उपलब्ध करुन प्रोसेसींग करणे, मोबाईल डिवाईस ४१ नग, डिस्टोमीटर ५ नग, याचबरोबर वेब आणि मोबाईल बेस्ड सॉफ्टवेअर अप्लिकेशन डेव्हलप करणे व त्याचे सहाय्याने दोन (२) वर्ष कालावधीत वृक्षगणना करणे व त्यापुढे तीन (३) वर्षे कालावधी देखभाल व दुरुस्ती करणे असे एकुण पाच (५) वर्षाकरिता या कामाची निविदा र.रु.6,80,53,559/- (अक्षरी सहा कोटी ऐंशी लाख त्रेपन्न हजार पाचशे एकोणसाठ फक्त) पेक्षा 4.95 टक्के कमी दराची निविदा मे.टेराकॉन इकोटेक प्रा.लि. या ठेकेदार यांचेकडून वृक्षगणना करणे व त्यासाठी येणा-या र.रु.६,४६,८३,८१४/- प्रमाणे मा.स्थायी समिती ठराव क्र.1069 दि.27/9/2017 अन्वये मान्यता मिळाली होती. तथापि सॉफ्टवेअर मधील तांत्रिक दोषामुळे निविदेतील रक्कम फक्त एकाच नगाप्रमाणे दर दर्शविल्यामुळे निविदेच्या प्रत्यक्ष दरामध्ये र.रु.29,58,904.50 इतका फरक प्रत्यक्ष दिसुन आल्याने सदरच्या रकमेमध्ये ही वाढ होता र.रु.6,76,42,718.50 (अक्षरी र.रू.सहा कोटी शहात्तर लाख बेचाळीस हजार सातशे अठरा रुपये पन्नास पैसे फक्त) इतकी होत आहे. हि रक्कम निविदा अंदाजपत्रकीय रक्कम रु.6,80,53,559/- पेक्षा 0.60 टक्के दराने कमी होत आहे. तरी र.रु.6,76,42,718.50 यास मान्यता घेणे आवश्यक असलेने मा.स्थायी समिती ठराव क्र. 1069 दि. 27/9/2017 रद्द करुन नव्याने निविदा अंदाजपत्रकीय रक्कम रु.6,80,53,559/- पेक्षा 0.60 टक्के दराने कमी होत आहे तरी र.रु.6,76,42,718.50/- (अक्षरी र.रू.सहा कोटी शहात्तर लाख बेचाळीस हजार सातशे अठरा रुपये पन्नास पैसे फक्त) या प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१२६० विषय क्रमांक – २०

दिनांक – ०८/११/२०१७ विभाग– लेखा

सूचक – मा.अमित गावडे अनुमोदक – मा.कैलास बारणे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.लेख/६/कावि/९९०६/२०१७ दि.०३/११/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

शहर अभियंता यांनी दि.३/११/२०१७ च्या प्रस्तावान्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विकास आराखड्यातील रस्ते व आरक्षणे विकसित करण्याबाबत मा. स्थायी समिती सभेच्या सूचना आहेत. सबब सन २०१७-१८ चे अंदाजपत्रक - ३, भाग - २, पान क्र.३७६ व ३७७, अ.क्र.४ लेखाशिर्ष - शहर विकास आराखडा या लेखाशिर्षाखाली करणेत आलेल्या तरतूदीमध्ये

विकास आराखड्यातील रस्ते/आरक्षणे विकसित करण्याची कामे समायोजित करून, सन २०१७-१८ चे अंदाजपत्रकातील संबंधित लेखाशिर्षामध्ये कामांच्या भांडवली वर्गीकरणाबाबत शहर अभियंता यांनी प्रस्तावित केलेनुसार महापालिका सभा ठराव क्र.४२ दि.२०/०६/२०१७ मा.महापालिका सभा ठराव क्र.४९ दि.२०/०७/२०१७ अन्वये प्रदान केलेल्या अधिकारानुसार र.रु.६,९९,९०,०००/- (अक्षरी र.रु.सहा कोटी नव्याण्णव लाख नव्वद हजार फक्त) प्रस्तावात नमुद प्रमाणे भांडवली वर्गीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – १२६१ विषय क्रमांक – २१
दिनांक – ०८/११/२०१७ विभाग– पाणीपुरवठा
सूचक – मा.उत्तम केंदळे अनुमोदक – मा.उषा मुंढे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.पापु/६/कावि/६९२/२०१७ दि.०३/११/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या पाणीपुरवठा विभागाच्या नि.नो.क्र.४/१/२०१७-१८ अन्वये Request for Proposal (RFP) for project management services for Sourcing of water from Andra Dam and Bhama Askhed Dam for Pimpri Chinchwad City या कामासाठी मे.डी.आर.ए. कन्सल्टंट प्रा.लि., यांची रक्कम रू. ७,२८,३७,०३०/- (अक्षरी र.रू.सात कोटी अठ्ठावीस लाख सदोतीस हजार तीस फक्त) दराने काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील तसेच या व्यतिरिक्त कामास लागू होणारे कर (उदा.G.S.T. किंवा इतर) म.न.पा.मार्फत प्रचलित दरानुसार अदा करण्यात येतील या अटीस अधिन राहून त्याच्याबरोबर करारनामा करुन घेणेस व प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – १२६२ विषय क्रमांक – २२
दिनांक – ०८/११/२०१७ विभाग– लेखा
सूचक – मा.माधुरी कुलकर्णी अनुमोदक – मा.हर्षल ढोरे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.लेखा/६/कावि/९९११/२०१७ दि.३/११/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

नवी सांगवी पिंपळे गुरव प्रभाग क्र.३१ मध्ये विविध भागात आवश्यकतेनुसार स्थापत्य विषयक कामांची अंदाजपत्रकामध्ये भांडवली वर्गीकरणाबाबत शहर अभियंता यांनी प्रस्तावित केलेनुसार महापालिका सभा ठराव क्र.४२ दि.२०/०६/२०१७ मा.महापालिका सभा ठराव क्र.४९ दि.२०/०७/२०१७ अन्वये प्रदान केलेल्या अधिकारानुसार र.रु.३,५०,००,०००/- (अक्षरी र.रु.तीन कोटी पन्नास लाख फक्त) प्रस्तावात नमुदप्रमाणे भांडवली वर्गीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**<u>यानंतर सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले ऐनवेळचे विषय घेणेत आले –</u>**

ठराव क्रमांक –१२६३ विषय क्रमांक – २३
दिनांक – ०८/११/२०१७ विभाग– नगररचना व विकास
सूचक – मा.उत्तम केंदळे अनुमोदक – मा.उषा मुंढे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.नरवि/कावि/३६/पिं.गुरव/३८६/२०१७
दि.०८/११/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मौजे पिंपळे गुरव, पिंपळे सौदागर, मौजे सांगवी पर्यंत संरक्षण विभागाच्या हद्दीलगत असलेल्या मंजूर विकास योजनेतील १२ मी./१८ मी. रुंद रस्त्यालगत संरक्षण विभागाच्या हद्दीतून आणखी १२ मी. रुंद रस्ता करणे व याव्यतिरिक्त मौजे सांगवी स.नं.६८ पासून (बी.आर.घोलप कॉलेजची उत्तरेकडील बाजू) ते नवी सांगवी बस स्टॉपपर्यंत अतिरिक्त २४ मी. रस्ता तसेच यापूर्वीच्या संरक्षण विभागाने मंजूरी दिलेल्या H to I (R3) रस्त्याकरीता अतिरिक्त १२ मी. रुंद रस्ता करणे आवश्यक आहे.

सदर नियोजित रस्त्यांची लांबी सुमारे ४९३० मी. इतकी असणार आहे. सदरची जागा सुमारे ६३९६० चौ.मी. व विकास योजनेतील १२ मी. व १८ मी. रुंद रस्त्यामधील उर्वरित क्षेत्रासह एकुण क्षेत्र संरक्षण विभागाचे असल्याने सदरचे क्षेत्र संरक्षण विभागाकडून मनपास हस्तांतरीत करावे लागणार आहे.

सदरचा अतिरिक्त रस्ता केल्याने,सदर रस्ता हा दोन बीआरटी रस्त्यांना जोडणार असल्याने वाहतुकीसाठी फीडर रुट म्हणून उपयोगात येणार आहे. तसेच सदर भागाचा विकास मोठ्या प्रमाणावर झालेला असल्याने वाहतुक सुरळीत व सुरक्षित होण्याच्या दृष्टीने सदरचा रस्ता होणे गरजेचे आहे.

तसेच या व्यतिरिक्त मौजे पिंपळे सौदागर येथील स.नं.१२१ मधील संरक्षण विभागाच्या हद्दीतील औंध रावेत ४५ मी. रस्ता व कोकणे चौक ते शिवार चौक ते साई चौक ४५ मी. रस्ता या दोन्ही रस्त्यांच्या (स.नं.१२१ मधील) गोलाईने बाधित होणारी (औंध बाजुकडील) १५० चौ.मी. जागा पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ताब्यात घेणे तसेच मौजे सांगवी येथील बी.आर.घोलप कॉलेजच्या पश्चिमेकडील बाजु ते महात्मा फुले पुलाच्या लँडींग पर्यंत असलेल्या शासनाच्या जागेतून २४ मी. चा रस्ता भूसंपादन करणेस तसेच पिंपरी वाघेरे येथील डेअरी फॉर्मलगत रेल्वे फाटक पासून कासारवाडी येथील शंकरवाडी शंकर मंदीरापर्यंत भुयारी मार्गापर्यंत भाग संरक्षण विभागाच्या मालकीचा आहे. रेल्वे लाईनलगत या भागातून १२ मी. रुंदीचा रस्ता करणे अत्यावश्यक असल्याने दि.०६/११/२०१७ चे मान्य प्रस्तावान्वये मा.आयुक्त सो. यांनी त्यांना मान्यता दिलेली आहे.

सदर रस्त्याचे क्षेत्र संरक्षण विभागाचे असल्याने सदरचे क्षेत्र संरक्षण विभागाकडून मनपास भूसंपादन करावे लागणार आहे. सदरच्या जागा संरक्षण विभागाकडून मनपास हस्तांतर करुन घेऊन संरक्षण विभागास सदर जागेचे मुल्य अदा करणे त्यासाठी आवश्यक सर्व्हेक्षण, मोजणी करणे इ. अनुषंगिक मंजुरीसह येणा-या सर्व खर्चाबाबत मा.आयुक्त सो. यांना संपुर्ण अधिकार देण्यास मा.शहर सुधारणा समिती ठ.क्र.१२ दि.२५/७/२०१७ अन्वये मा.शहर सुधारणा समितीने व मा.महापालिका सभा ठराव क्र.६१, दि.१९/०८/२०१७ अन्वये महापालिका सभेने मान्यता दिलेली आहे. त्यानुसार सदरच्या जागा संरक्षण विभागाकडून मनपास हस्तांतर करुन घेऊन संरक्षण

विभागास सदर जागेचे मुल्य अदा करणे. त्यासाठी आवश्यक सर्व्हेक्षण,मोजणी करणे इ. अनुषंगिक मंजुरीसह येणा-या सर्व खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१२६४ विषय क्रमांक – २४

दिनांक – ०८/११/२०१७ विभाग– पर्यावरण अभियांत्रिकी

सूचक – मा.माधुरी कुलकर्णी अनुमोदक – मा.हर्षल ढोरे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.पअक/१/कावि/६७०/१७ दि.७/११/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पर्यावरण अभियांत्रिकी विभागाकडील नि.नो.क्र.ENV3/1-2017-18 मधील क,ड व ई क्षेत्रीय कार्यालयाचे परिसरातील मैला शुद्धीकरण केंद्रातील स्लजची वाहतूक करणे या कामासाठी मे.शुभम उद्योग यांचेकडून नि.र.रु.८३,९८,४५४/- (अक्षरी रक्कम रुपये त्र्याऐंशी लाख अठठ्याण्णव हजार चारशे चोपन्न फक्त) -०७.२५% कमी (सुधारीत दरासह) या दराने करुन घेणेस यांचेसोबत करारनामा करुन कामाचे आदेश देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१२६५ विषय क्रमांक – २५

दिनांक – ०८/११/२०१७ विभाग– स्थापत्य BSUP प्रकल्प

सूचक – मा.निर्मला कुटे अनुमोदक – मा.आशा धायगुडे-शेंडगे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/BSUP प्र/५०३/१७ दि.६/११/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मे.M.M.Project Consultants Pvt.Ltd. यांची पंतप्रधान आवास योजनेतील प्रकल्पांसाठी झोपडपट्टी पुनर्वसनाकरिता व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी घरे बांधणेकरिता महानगरपालिकेकडील प्रचलित सल्लागार फी नुसार आर्किटेक्ट सल्लागार सेवेसाठी DPR Cost च्या ०.९०% व Infra साठी निविदा रकमेच्या ०.९०% प्रकल्प खर्चावर फी व प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार या सेवेसाठी प्रत्यक्ष प्रकल्प खर्चाच्या १.४५% फी अशी एकुण २.३५% फी देवून त्यांची नेमणूक करणेकामी करारनामा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१२६६ विषय क्रमांक – २६

दिनांक – ०८/११/२०१७ विभाग–स्थापत्य ड क्षेत्रीय कार्यालय

सूचक – मा.अनुराधा गोफणे अनुमोदक – मा.वैशाली काळभोर

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.डक्षे/स्था/कावि/११३३/२०१७ दि.८/११/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

दि.१६/१०/२०१७ रोजीच्या मा.महानगरपालिका सभेच्या विषय क्र.१४ यास मा.नगरसदस्य यांनी उपसूचना दिलेल्या असून सदर उपसूचना मा.महानगरपालिका सभेने ठराव क्र.९७ दि.१६/१०/२०१७ अन्वये मान्य केलेल्या आहेत. प्रस्तावात नमूदप्रमाणे मूळ ठरावास

मा.नगरसदस्य यांनी उपसूचनाद्वारे सदस्य ठरावामार्फत दिलेल्या असून सदरचे उपसूचनेसह मंजूर झालेल्या ठरावातील प्रशासकीय मान्यता मिळालेल्या कामांना तरतूद करणे आवश्यक आहे. तरी प्रस्तावात नमूद प्रमाणे तरतूद वर्गीकरणास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१२६७ विषय क्रमांक – २७

दिनांक – ०८/११/२०१७ विभाग– ड क्षेत्रीय कार्यालय

सूचक – मा.मोरेश्वर भोंडवे अनुमोदक – मा.राजू मिसाळ

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.डक्षे/३/कावि/३०३/२०१७ दि.०७/११/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे-

कै.शंकर हुसेन लोखंडे हे ड क्षेत्रीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील आरोग्य पिंपळे सौदागर विभाग प्रभाग क्र.५५ मध्ये घंटागाडी ठेकेदार म्हणून सन १९९८ पासून काम करीत होते. सन २०१६ मधील गणपती उत्सवाच्या काळात त्यांना दत्तमंदिर गणपती विसर्जन घाटावर निर्माल्य गोळा करुन निर्माल्य कुंडात टाकण्याचे काम देण्यात आले होते. परंतु पाण्यामध्ये बुडून दिनांक १६/०९/२०१६ रोजी त्यांचा मृत्यू झाला असून त्यांच्या जागी घंटागाडी ठेकेदार म्हणून घेणेकामी त्यांचा मुलगा श्री.दुर्गाजी शंकर लोखंडे यांनी दिनांक१६/०६/२०१७ रोजी विनंती अर्ज केला आहे.

सबब सद्यस्थितीत काम करणारे इतर घंटागाडी ठेकेदारांना लागु असणा-या सर्व अटी शर्ती कायम ठेवून श्री.दुर्गाजी शंकर लोखंडे यांची घंटागाडी ठेकेदार म्हणून नियुक्ती करणेस व सद्यस्थितीत घंटागाडी ठेकेदारांना प्रति महिना देय असणारे मानधन र.रु.१५,०००/- त्यांना देणेबाबत, त्याचबरोबर इतर घंटागाडी ठेकेदारास सद्यस्थितीत देण्यात येत असणारे लाभ त्यांना देणेकामी व कामाचा आदेश देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१२६८ विषय क्रमांक – २८

दिनांक – ०८/११/२०१७ विभाग–फ क्षेत्रीय कार्यालय,स्थापत्य

सूचक – मा.उत्तम केंदळे अनुमोदक – मा.कैलास बारणे

संदर्भ – मा.उत्तम केंदळे, मा.कैलास बारणे यांचा प्रस्ताव...

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे प्रभाग क्र.११ मधील पूर्णानगर येथिल से.क्र.१८ सीडीसी मधील मोकळी जागा क्र.४ पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणांकडून महानगरपालिकेस हस्तांतरीत करणेत आलेली आहे. सदर प्रभागातील नागरीकांना विविध नागरी सुविधा देणेकरीता व शहर सुशोभिकरणाचे दृष्टीने सदरची मोकळी जागा विकसित करणे आवश्यक आहे. सदर ठिकाणचे नकाशे, अंदाजपत्रक तयार करण्यासाठी व आवश्यक परवानग्या घेणेकरीता पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या पॅनलवरील वास्तु विशारदाची नेमणूक करणे आवश्यक आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिका वास्तूविशारद पॅनलवरील वास्तूविशारद मे.शिल्पी आर्किटेक्ट अँड प्लॅनर्स (पारस नेत्रगांवकर) हे सदरचे काम करणेस तयार आहेत. तरी त्यांची विषयांकीत कामाकरीता वास्तूविशारद म्हणून नेमणूक करण्यास तसेच मा.आयुक्त सो. यांनी दि.१०/८/२०१७ चे प्रस्तावान्वये मंजुर केलेल्या दराप्रमाणे व मा.स्थायी समितीने ठराव क्र.८६७ दि.२३/८/२०१७

अन्वये मान्यता दिलेले दरानुसार १) ५ कोटी रक्कमेपर्यंतचे कामाकरीता निविदापूर्व ०.७५% व निविदा पश्चात कामासाठी १.२५% असे एकूण २.००% आणि २) ५ कोटी ते २० कोटी रक्कमेचे कामासाठी निविदापूर्व कामासाठी ०.७५% व निविदा पश्चात कामासाठी १.००% असे एकूण १.७५% फी सर्व करांसह अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१२६९ विषय क्रमांक – २९

दिनांक – ०८/११/२०१७ विभाग–फ क्षेत्रीय कार्यालय,स्थापत्य

सूचक – मा.कैलास बारणे अनुमोदक – मा.उत्तम केंदळे

संदर्भ – मा.कैलास बारणे,मा.उत्तम केंदळे यांचा प्रस्ताव...

पिंपरी चिंचवड मनपाचे क क्षेत्रीय कार्यालयाचे कार्यक्षेत्रातील १) प्रभाग क्र.२ मधील देहू आळंदी मुख्य रस्ता लगतचे परिसरातील ताब्यात आलेले डी.पी. रस्ते विकसीत करणे, २) प्रभाग क्र.२ मधील वडाचा मळा परिसरातील ताब्यात आलेले डी.पी. रस्ते विकसीत करणे, ३) प्रभाग क्र.२ बो-हाडेवाडी बनकरवस्ती मधील ताब्यात आलेले डी.पी. रस्ते विकसीत करणे या कामांच्या अंदाजपत्रकीय रक्कमेच्या र.रु.५ ते २० कोटींसाठी एकूण १.७५% त्यामध्ये प्री टेंडरींगसाठी ०.७५% व पोस्ट टेंडरींगसाठी १%, तसेच प्रभाग क्र.६ मोशी बो-हाडेवाडी येथील ताब्यात येणा-या गायरान जागेतील आरक्षणावर शाळा इमारत बांधणे कामांच्या अंदाजपत्रकीय रक्कमेच्या र.रु.२ ते १० कोटी साठी एकूण २.००% त्यामध्ये प्री टेंडरींगसाठी १.२५% व पोस्ट टेंडरींगसाठी ०.७५% देय राहील, त्याच प्रमाणे अधिक सर्वकर देय राहतील. याकामी मे.सचिन आपटे असोसिएटस् यांची वास्तुविशारद व सल्लागार म्हणून नेमणूक करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१२७० विषय क्रमांक – ३०

दिनांक – ०८/११/२०१७ विभाग–फ क्षेत्रीय कार्यालय,स्थापत्य

सूचक – मा.अमित गावडे अनुमोदक–मा.माधुरी कुलकर्णी

संदर्भ – मा.अमित गावडे, मा.माधुरी कुलकर्णी यांचा प्रस्ताव...

प्रभाग क्र.३१ नवी सांगवी पिंपळे गुरव भागातील खालील अ.क्र.१,२,३ या कामांना मे.इन्फीनिटी कन्सल्टिंग इंजिनिअर्स यांची सल्लागार म्हणून नेमणूक करण्यास व अ.क्र.४ व ५ या कामांना मे.पेव्हटेक कन्सल्टंट यांची सल्लागार म्हणून नेमणूक करण्यास मान्यता देणेत येत आहे. सदर कामे तातडीची असून स्थापत्य, पाणीपुरवठा, विद्युत व जलनिःसारण विभागाने एकत्रित करावयाची असल्याने त्यास मान्यता देणेत येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | लेखाशिर्ष | पान क्र. | अ. क्र. | नेमणूक करावयाचे सल्लागार |
|---|---|---|---|---|---|
| १ | प्रभाग क्र.५७ पिंपळे गुरव रस्त्याच्या कडेने पेव्हींग ब्लॉक्स बनविणे व अद्ययावत पद्धतीने विकसित करणे. | दगड फरशी व फुटपाथ | १९० | १६५ | मे.इन्फीनिटी कन्सल्टिंग इंजिनिअर्स |
| २ | प्रभाग क्र.५७ पिंपळे गुरव येथील विनायक नगर, कवडेनगर व इतर भागात पेव्हींग | दगड फरशी व फुटपाथ | १९० | १६६ | मे.इन्फीनिटी कन्सल्टिंग इंजिनिअर्स |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | ब्लॉक्स बनविणे व अद्ययावत पद्धतीने विकसित करणे. | | | | |
| ३ | प्रभाग क्र.५८ नवी सांगवी येथील रस्त्याची विशेष दुरुस्ती कामे करणे. | डांबरी रस्ते-मुख्यालय | १८१ | १५९ | मे.इन्फीनिटी कन्सल्टिंग इंजिनिअर्स |
| ४ | प्रभाग क्र.५७ (नवीन प्रभाग ३१) पिंपळे गुरव मधील बँक ऑफ महाराष्ट्र ते ओरीयाना इमारतीपर्यंतचा रस्ता अद्ययावत पद्धतीने विकसित करणे. | डांबरी रस्ते - मुख्यालय | १८१ | १६२ | मे.पेव्हटेक कन्सल्टंट |
| ५ | प्रभाग क्र.५७ (नवीन प्रभाग ३१) पिंपळे गुरव मधील काटेपुरम चौक ते मनपा शाळा पर्यंतचा रस्ता अद्ययावत पद्धतीने विकसित करणे. | डांबरी रस्ते - मुख्यालय | १८१ | १६३ | मे.पेव्हटेक कन्सल्टंट |

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१२७१ विषय क्रमांक – ३१

दिनांक – ०८/११/२०१७

सूचक – मा.निर्मला कुटे अनुमोदक–मा.अनुराधा गोफणे

संदर्भ – मा.निर्मला कुटे,मा.अनुराधा गोफणे यांचा प्रस्ताव...

पिंपरी चिंचवड जिल्हास्तरीय महापौर चषक अर्ध मॅरेथॉन स्पर्धा रविवार दि.२६/११/२०१७ रोजी सकाळी ७.३० वा. स्थळ:- च-होलीगाव ते मोशी ते निगडी मार्ग या ठिकाणी आयोजित करण्यात यावी. त्यासाठी गट खालीलप्रमाणे –

१) पुरुष गट – २१ Km
२) महिला गट – २१ Km
३) १८ वर्षे मुले शालेय गट – ६ Km
४) १८ वर्षे मुली शालेय गट – ६ Km
५) १६ वर्षे मुले शालेय गट – ४ Km
६) १६ वर्षे मुली शालेय गट – ४ Km
७) १४ वर्षे मुले शालेय गट – ३ Km
८) १४ वर्षे मुली शालेय गट – ३ Km

वरील प्रत्येक गटातील प्रथम दहा क्रमांक पर्यंत बक्षिसे देणेत येईल. बक्षीस स्वरुप रोख पारितोषिक,ट्रॉफी, सर्टिफिकेट सह, पुर्ण स्पर्धासाठी अंदाजे खर्च र.रु.१८,००,०००/- (अक्षरी र.रु अठरा लाख रुपये) इतका खर्च येणार असल्याने प्रस्तावात नमूद प्रमाणे स्पर्धा आयोजित करणेस व त्यासाठी येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१२७२ विषय क्रमांक – ३२

दिनांक – ०८/११/२०१७

सूचक – मा.उषा मुंढे अनुमोदक–मा.अनुराधा गोफणे

संदर्भ – मा.उषा मुंढे, मा.अनुराधा गोफणे यांचा प्रस्ताव...

पिंपरी चिंचवड शहरातील बेवारस कुत्र्यांचे निर्बीजीकरण करणेकामी प्रति शस्त्रक्रिया रु.६९३/- प्रमाणे ३ संस्थांची नेमणूक करणेस मान्यता झाली आहे. शहराचा वाढता विस्तार, एकुण प्रभाग क्षेत्रांची संख्या, बेवारस कुत्र्यांची तक्रारींची वाढती संख्या लक्षात घेता मे.ऍनिमल वेलफेअर बोर्ड ऑफ इंडीया यांचेकडील नोंदणीकृत (AWBI रजिस्ट्रेशन नं. MH078-2001) यादीमध्ये समाविष्ट असलेल्या आणि विषयाधिन कामाचा अनुभव असलेल्या मे.लक्ष्मी इन्स्टिट्युट ऑफ ऍनिमल वेलफेअर, अमरावती (रजिस्ट्रेशन नं.MH-219-2001 AWBI रजिस्ट्रेशन नं. MH078-2001) या संस्थेस निविदेनुसार प्राप्त झालेल्या दरानुसार (र.रु.६९३/- प्रति केस प्रमाणे) बेवारस कुत्र्यांवर Animal Birth Control Program राबविणेकामी नेमणूक देण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१२७३ विषय क्रमांक – ३३

दिनांक – ०८/११/२०१७

सूचक – मा.उत्तम केंदळे अनुमोदक–मा.आशा धायगुडे-शेंडगे

संदर्भ – मा.उत्तम केंदळे,मा.आशा धायगुडे-शेंडगे यांचा प्रस्ताव...

कुलस्वामिनी महिला संघ ही बचत गट संस्था गेले ५ वर्षांपासून यमुनानगर येथील भागात यशस्वीपणे चालू आहे. या बचत गटाचे कार्य पिंपरी चिंचवड शहरात उल्लेखनीय आहे. कुलस्वामिनी महिला संघ या बचत गटास यमुनानगर येथील कै.रमाबाई ठाकरे वाचनालय येथील पालिकेची लायब्ररी चालवायला दिल्यास वाचनालयाचे योग्य ते नियोजन करुन वाचनालय व्यवस्थित चालवतील. तरी त्यांना वाचनालय चालविणेस देण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१२७४ विषय क्रमांक – ३४

दिनांक – ०८/११/२०१७

सूचक – मा.कैलास बारणे अनुमोदक–मा.आशा धायगुडे-शेंडगे

संदर्भ – मा.कैलास बारणे,मा.आशा धायगुडे-शेंडगे यांचा प्रस्ताव...

शैक्षणिक गुणवत्तेचा दर्जा वाढविणेसाठी महापालिकेच्या माध्यमिक शिक्षण विभागात तासिका तत्वावरील शिक्षकांना रुपये ५४/- तासिकेप्रमाणे मानधन दिले जात आहे. हे मानधन अत्यंत अपुरे असल्याने दर्जेदार व गुणवत्तापूर्ण कामकाज होत नाही. सदर वेतन अन्यायकारक वाटते. पुणे महानगरपालिकेचे किमान वेतन र.रु.१२,०००/- (अक्षरी रक्कम रुपये बारा हजार फक्त) आहे. शिक्षकांना वेतन चांगले मिळत असल्याने सदर शिक्षक मानसिक समाधानाने व आनंदाने अध्यापनाचे काम करतात. पुणे महानगरपालिकेप्रमाणे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या माध्यमिक शिक्षण विभागातील तासिक तत्वावरील शिक्षकांना दरमहा एकत्रित मानधन र.रु.१२,०००/-(अक्षरी रक्कम रुपये बारा हजार फक्त) देण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक –१२७५ विषय क्रमांक – ३५

दिनांक – ०८/११/२०१७

सूचक – मा.उषा मुंढे अनुमोदक–मा.आशा धायगुडे-शेंडगे

संदर्भ – मा.उषा मुंढे,मा.आशा धायगुडे-शेंडगे यांचा प्रस्ताव…

इंद्रायणीनगर सेक्टर क्र.४ व ६ मध्ये, प्राधिकरणाकडून हस्तांतरीत झालेले क्रीडा संकुल ॲक्युपन्सी तत्वावर आधारीत दर निश्चित करुन मे.श्री.लक्ष्मणभाऊ कला अँड क्रीडा अकॅडमी,सांगवी, पुणे – २७ या संस्थेस ५ वर्ष कालावधीसाठी देण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१२७६ विषय क्रमांक – ३६

दिनांक – ०८/११/२०१७

सूचक – मा.हर्षल ढोरे अनुमोदक–मा.वैशाली काळभोर

संदर्भ – मा.हर्षल ढोरे,मा.वैशाली काळभोर यांचा प्रस्ताव…

प्रभाग क्र.६ येथील मोशी-आळंदी रस्ता-गायरान रस्ता-कुदळेवस्ती-आरक्षण क्र.१/२१४ ते आळंदी रस्त्यापर्यंत विकास आराखड्यातील रस्ता विकसित करणे. (गट क्र.३६३ ते २५१) रस्ता करणेकामी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सल्टंट) म्हणून मे.अश्युअर्ड इंजिनिअरींग सर्व्हिसेस यांची सदर प्रकारच्या कामाचा पुर्वअनुभव लक्षात घेता त्यांची निविदा पुर्व व निविदा पश्चात कामासाठी नेमणुक करण्यास व प्रकल्प तांत्रिकदृष्टया यशस्वीपूर्ण होणेकामी मनपाचे प्रचलित दरानुसार निविदा पूर्व कामासाठी, निविदा रकमेवरती ०.५०% व निविदा पश्चात कामासाठी प्रत्यक्ष खर्चाच्या १.००% अधिक शासन कर इतकी फी अदा करणेसह या कामासाठी मे.अश्युअर्ड इंजिनिअरींग सर्व्हिसेस यांची सदर कामास सल्लागार म्हणून नेमणूक करणेस व मनपाच्या पॅनेलवर नियुक्ती करणेस मान्यता देणेत येत आहे.


सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**(सिमा रविंद्र सावळे)**
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव विभाग,
क्रमांक - नस/१०/कावि/८२/२०१७
दिनांक - २२/११/२०१७



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

**प्रशिक्षणाची यादी (प्रपत्र -अ)**

**( विषय क्र. १७ चे लगत )**

| अ. क्र. | प्रशिक्षणाचे नाव | प्रशिक्षण कालावधी दिवस आणि तास | शैक्षणिक पात्रता (अर्हता ) | शुल्क प्रति लाभार्थी (सर्वकरा सहित) | अभ्यासक्रम |
|---|---|---|---|---|---|
| १ | वनस्पती ऊती संवर्धन ( प्लांट टिशु कल्चर Plant tissue culture) | सात दिवस ०३ तास प्रती दिवस | साक्षर | रु. २८०० प्रती लाभार्थी | स्वच्छता आणि निर्जंतुकीकरण, एक्स प्लॉन्ट तयार करणे व त्याचे प्रकार, इनॉक्युलेशन , इनक्युबेशन प्रायमरी हार्डनिंग, सेकंडरी हार्डनिंग, शासकीय योजना आणि अनुदान. |
| २ | बटन अळंबी लागवड (बटन मशरूम कल्टिव्हेशन Button Mashroom cultivation) | पाच दिवस ०३ तास प्रती दिवस | साक्षर | रु. २००० प्रती लाभार्थी | अळंबीची ओळख, अळंबीचे प्रकार, आहारातील महत्व, पौष्टिक मूल्य, मशरूम युनिटचा आराखडा, , कंपोस्टिंग फेज १, फेज २, स्पॉनिंग, केसिंग, ग्रोईन्ग, फ्लशिंग, काढणी, पॅकेजिंग, विविध प्रकारचे रोग, बाजारपेठेची माहिती, शासकीय योजना, अनुदान |
| ३ | ( वृक्षसर्वेक्षक) Tree Surveyor | ०३ दिवस, प्रती दिवस ०३ तास | साक्षर | रु. १२०० प्रती लाभार्थी | वनस्पती ओळखण्याचे तंत्र, जीआयएस प्रणाली बद्दलमाहिती, जीआयएस प्रणाली बद्दल माहिती, मोबाईल वृक्षगणने साठीचा वापर, वेगवेगळया फ्लोरांची ओळख, फ्लोरा ऑफ महाराष्ट्र, फ्लोरा ऑफ वेस्टर्न घाट, फ्लोरा ऑफ कोल्हापूर, ट्रीज ऑफ पुणे, शोभेची झाडे, रस्ताच्याकडेला व उद्यानात लावण्यात येणा-या झाडांची ओळख, विषयांची व्याप्ती व उपयोग. व्यवसाय कसा करावा या बाबत मार्गदर्शन. |
| ४ | सुक्या फुलांची रचना (Dry Flower arrangement) | तीन दिवस, ०३ तास प्रती दिवस | साक्षर | रु. १२०० प्रती लाभार्थी | संकल्पना, फुले सुकवणाच्या वेगवेगळ्या पद्धती, ब्लिचिंग , फुले रंगविणे, पॉटप्युरी, सुक्या फुलांच्या रचनेसाठीच्या फुलदाणी, सुकी फुले हस्तकला, सुक्या फुलांच्या रचनेसाठी लागणा-या वस्तूंची ओळख, हार, स्वाग, संचेट तयार करण्याचा पद्धती, उपलब्ध बाजार पेठ. |
| ५ | सेंद्रिय भाजीपाला उत्पादन Organic vegetable Farming | तीन दिवस, ०३ तास प्रती दिवस | साक्षर | रु. १२०० प्रती लाभार्थी | एकात्मिक सेंद्रिय शेती व्यवस्थापन, जमिनीचे व्यवस्थापन, जैविक तण व कीड नियंत्रण, जैविक व सेंद्रिय खते उत्पादन, सेंद्रिय उत्पादन विक्री व्यवस्थापन, सेंद्रिय प्रमाणी करणव्यवस्था, काडी कच-या पासून कंपोस्ट व गांडूळखत, १) शेणखत २) कंपोस्टखत ३) हिरवळीचीखते ४) गांडूळखत ५) माशाचेखत ६) खाटीकखान्याचे खत, ईएम- द्रावण तयार करण्याची पद्धत. कंपोस्ट आणि खते, जैविक कीटकनाशके, शेणखत स्लरी, पंचगव्य, बीजामृत, जीवामृत, बियाणे निवड, जमिनीची मशागत, जैविक तण नाशके, काढणी, पॅकेजिंग, बाजारपेठ, शासकीय योजना, सेंद्रिय पद्धतीने पालक, मेथी, कोथिंबीर व मुळा यासारख्या भाज्यांची लागवड. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ६ | चारा व्यवस्थापन (Fodder Management) | दोन दिवस, ०३ तास प्रती दिवस | साक्षर | रु. ८०० प्रती लाभार्थी | मूरघास, अझोला लागवड, हायड्रोपोनिक्स पद्धतीने चारा उत्पादन, ओला चारा – हायब्रीड नेपियर, बाजरी, ज्वारी , मका, चवळी, स्टाॅयलो, तांदूळकोंडा, पॅरागवत , ब्लु-बफेल गवत, अल्फा अल्फा गवत याबाबत माहिती व सुकाचारा, शेवगा, शेवरी ,सुबाभूळ, गिरीपुष्प, हादगा, इ. वनस्पतीची चा-यासाठी लागवड |
| ७ | पॉली हाउस तंत्रज्ञान हरित गृहातील शेती तंत्रज्ञान Poly house technology | पाच दिवस, ०३ तास प्रती दिवस | साक्षर | रु. २००० प्रती लाभार्थी | संकल्पना आणि तत्व, पॉली हाऊसची ओळख, नियंत्रित वातावरणातील शेतीचा आढावा, हरितगृहातील लागवड करण्यात येणा-या वनस्पती–शोभवंत आणि भाजीपाला, वनस्पतींचा वातावरणातील घटकांना मिळणार प्रतिसाद- प्रकाशाची तीव्रता आणि गुणवत्ता, प्रकाशवधी प्रतिसाद, वा-याचावेग , तापमान, छत, हवेतील सूक्ष्म वातावरण, वनस्पती पोषके, सिंचन, वनस्पती आणि पाणी यांचा संबंध, शासकीय योजना, अनुदान. |
| ८ | देशी गाई संगोपन आणि विविध उत्पादने Desi cow raring and its products | तीन दिवस, ०३ तास प्रती दिवस | साक्षर | रु. १२०० प्रती लाभार्थी | देशी गाई संगोपन - संकल्पना, देशी गाईच्या विविध जाती व त्याची माहिती, देशी गाईचे चारा व्यवस्थापन, आदर्शगोठा, पाण्याचे नियोजन, उच्च प्रतीच्या गाईची उपलब्धता व दर, देशी गाईचे आरोग्य, आजार व उपचार याबाबत माहिती. धूपकाडी, शुद्ध तूप बनवण्याच्या पद्धती, हवन सामुग्री, गोमूत्र अर्क बनविणे, सेंद्रिय A २ दूध संकल्पना आणि उपलब्ध बाजारपेठ, आंघोळीचा साबण, शाम्पू बनविणे, गुदमारादि अर्क, बीजामृत जीवामृत गोमूत्र हरितकी. |
| ९ | बुके आणि हार तयार करणे Bouquet and Garland Making | दोन दिवस , ०३ तास प्रती दिवस | साक्षर | रु. ८०० प्रती लाभार्थी | पुष्पगुच्छचे विविध प्रकार, कटफ्लॉवर्स आणि लूजफ्लॉवर्स, शाकीय व पुनरुत्पादीत अवयव, बुके तयार करण्यासाठी वापरल्या जाणा-या इतर वस्तू, थर्माकॉल बॉल, सॅटिन रिबीन, चमकी, फ्लोरल डिंक, फ्लोरल होल्डर, रबर बँड, बुके तयार करण्यासाठी लागणारी उपकरने - कात्री, सिकेटर्स, वेगेवेगळी कंटेनर्स, बुके जास्तकाळ टिकण्यासाठीचे उपाय, विक्री व्यवस्था, सॅम्पल बुके तयार करणे. |
| १० | हायड्रोपोनिक्स Hydroponics | दोन दिवस, ०३ तास प्रती दिवस | साक्षर | रु. ८०० प्रती लाभार्थी | हायड्रोपोनिक्स तंत्रज्ञानाची ओळख, संकल्पना, प्लांट फिजिओलॉजि, वनस्पतीच्या गरजा, हायड्रोपोनिक्स ग्रोविंग सिस्टिम, वनस्पतीवाढी साथीचे माध्यम, बाजारपेठ, अर्थशास्त्र, वेगवेगळी डिझाईन्स, हायड्रोपोनिक्स तंत्रज्ञानाचेफायदे , हायड्रोपोनिक्स तंत्रज्ञाने लागवड करता येणा-या वनस्पती, निगा व दुरुस्ती, सिंचन, पौष्टिक, काढणी, शासकीय योजना, भविष्यातील संधी. |
| ११ | लँडस्केपींग Landscaping | सहा दिवस, ०३ तास प्रती दिवस | साक्षर | रु. २४०० प्रती लाभार्थी | तत्व, सपाट भागावरील व टेकडीवरील लँडस्केपींग, लँडस्केपींग मधील उपकरणांची ओळख आणि उपयोग, ड्राइंग, घरगुती बागा, सार्वजनीकबाग/उद्याने, रस्त्याच्या कडेची, फार्मसंकुलांची, संस्थांची रेखाचित्रे आणि रचना, वेगवेगळ्या बागांचा आराखडा, वनवास रचना व लेथ हाऊसची रचना, विशिष्ट क्षेत्रासाठी लॅण्डस्केप रचना, |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | लॅण्डस्केपसाठी वापरण्यात येणा-या वनस्पती, चिन्हे, दगडाचे तुकडे व इतर साहित्य, लॅन्डस्केपिंगसाठी वापरात येणारी साधने व अवजारे. |
| १२ | फळप्रक्रिया<br>**Fruit Processing** | तीन दिवस, ०३ तास प्रती दिवस | साक्षर | रु. ८०० प्रती लाभार्थी | फळे व भाजीपाला वर्गीकरण, फळांचा रस काढणे, कच्चा मालाची निवड, क्रशिंग, प्रेसिंग, गाळणे, प्रोसेसिंग, बॉटलिंग, ऋतू नुसार पहिले व भाजीपाला खरेदी, फूड मशीनरी, कॅनिंग प्रक्रिया, वेगवेगळे ड्रायर वापरून पहिले व भाजीपाला सुकविणे, जॅम, जेली तयार करणे, फळांचा ज्युस व पल्पपेक्टिन टेस्ट , मार्मालेडस तयारकरणे, लोणची, टोमॅटो केचअप , सॉस , प्युरी आणि पेस्ट तयार करणे, बटाटा वेफर्स आणि फिंगर चिप्स तयार करणे, व्हिनेगर तयार करणे, विक्री व्यवस्था उभारणे, वेगेवेगळ्या फूड इंडस्ट्रीला भेटी देणे व अहवाल तयार करणे, शासकीय योजना. |
| १३ | आयुर्वेदिक उत्पादने<br>**Ayurvedic Preparations,** | चार दिवस, ०३ तास प्रती दिवस | साक्षर | रु. १६०० प्रती लाभार्थी | औषधी वनस्पतींची ओळख त्यातील सक्रिय तत्वे, उपयोग, वापरण्यात येणारे वनस्पतीचे भाग, शतावरी, अडुळसा, गुळवेल, कोरपड, आवळा, तुळस, नागरमोथा, कंबरमोडी, पुनर्नवा, पाणकणीस, धोत्रा, कडुनिंब, कुडा, सातवीण, भुईरिंगणी, आघाडा, शंखपुष्पी, टाकळा, हिरडा, बेहडा, एरंड, भुईआवळा, पळस, साग, बहावा, त्रिधारी निवडुंग, सागरगोटा, सुंठ, आले, हळद, पिंपळी, हरळी, मुरुडशेंग, धायटी, पपई, गोखरू, तालीमखाना, शिकेकाई, लिंबू, करंज, सीताफळ, काटेसावर, बाभूळ, दातवणाची झाडे, रुई, बिब्बा, अफू, रिठा, अर्जुन, आंबेहळद, जमालगोटा, इंद्रावण, इसबगोल, लसूण, ओवा, अश्वगंधा इ.चूर्ण तयार करणे (त्रिफळा चूर्ण), अरिष्ट (अशोकारिष्ट), आणिआसव (कुमारीसव), संकल्पना न्यूट्रास्युटिकल्स व कॉस्मीसुटिकल्स, आवळा व कोरपड उत्पादने, लेह, तैला, घृता, वटी, गुटिका, कास्य, अवलेह, अर्क, आमलाकँडी, मुरब्बा तयार करणे. |
| १४ | खते व कंपोस्ट तयार करणे<br>**Compost and Manure Preparation,** | दोन दिवस, ०३ तास प्रती दिवस | साक्षर | रु. ८०० प्रती लाभार्थी | कंपोस्टचे वेगेवेगळे प्रकार, कोंबडीखत, गांडूळखत, अळंबीखत, फार्मयार्ड मॅन्यूअर, ऐरोबिक आणि एनएरोबिक कंपोस्टिंग, कंपोस्टिंग मधील वेगवेगळे सूक्ष्मजीव-बॅक्टरीया व बुरशी व इतरजीव ,खताचे पॅकिंग कसे करावे, बाजारपेठ कशी उपलब्ध करावी, कंपोस्टिंग तयार करण्याच्या पद्धती, घरगुती कच-यापासून खत तयार करणे. |
| १५ | गच्ची वरील बाग<br>**Terrace Gardening,** | तीन दिवस, ०३ तास प्रती दिवस | साक्षर | रु. १२०० प्रती लाभार्थी | वनस्पती जीवनचक्र, वनस्पती शरीर विज्ञानशास्त्र, भाजीपाला बॅग, पौष्टिकबाग, किचनगार्डन, आंतर मशागत नियोजन, आराखडा आणि व्यवस्थापन, बियाणे प्रक्रिया, प्लँटींग मटेरियल, आंतर मशागत, ग्रोथ रेग्युलेटरचा वापर, पाण्याचे व्यवस्थापन, खताचे नियोजन, तण व्यवस्थापन, जमिनीचा कस, रोग व किडीचे व्यवस्थापन, कुंडयांचे प्रकार, शोभिवंत झाडे - |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | वृक्ष, झुडपे, वेली, प्रुनिंग व ट्रैनिंग, बागकामाची अवजारे, थंड हवामानातील भाजीपाला, उष्ण हवामानातील भाजीपाला, जैविक खते, जैविक कीडनाशके. |
| १६ | भाजीपाला सुकविणे व पावडर तयार करणे **Vegetable Dehydration and Powders,** | दोन दिवस, ०३ तास प्रती दिवस | साक्षर | रु. ८०० प्रती लाभार्थी | फळे आणि भाजीपाला प्रक्रियांची ओळख, संघटनात्मक मानके आणि नियम, काम करण्याच्या जागेची तयारी आणि देखभाल, वेगेवेगळ्या मशिन्स, अन्न सूक्ष्म जीवशास्त्र, अन्नातुन पाणी काढून टाकणाची आणि सुकवण्याच्या प्रक्रियांची तयारी व अंमलबजावणी, दस्तऐवजीकरण आणि रेकॉर्ड ठेवणे, अन्न सुरक्षितता स्वच्छता आणि आरोग्य विषयक व्यवस्था, व्यावसायिक कौशल्ये, सुकवणे ह्या प्रक्रियेवर परिणाम करणारे घटक, सूर्य प्रकाशात वाळविणे, डिहायड्रेटरचे प्रकार, उष्णता पस्रवणाची हवेची एक पद्धत, ड्रम ड्रायिंग , फ्रिज ड्रायिंग, फळे आणि भाजीपाला सुकवणाच्या प्रक्रियेतील टप्पे. |
| १७ | बोन्साय बनविणे **Bonsai Making,** | तीन दिवस, ०३ तास प्रती दिवस | साक्षर | रु. १२०० प्रती लाभार्थी | बोन्साय संकल्पना, बोन्सायच्या विविध शैली, अपराइट, कॅसकेड , मल्टि'पलट्री, फॉरेस्ट स्टाईल, ट्रट्री आणि ट्रंक स्टाईल, राफ्टस्टाईल, मिनीएचर, ड्राफ्टवुड बोन्साय, एक्सपोज्ड रूट स्टाईल, बोन्सायसाठी वनस्पतीची निवड, कटिंग, ग्राफ्टिंग, लेअरिंग, रेफाईनिंग बोन्साय स्पेसिज, रूट, ट्रंक, फांद्या, पाने, बोन्सायसाठीची अवजारे व खते. |
| १८ | कडकनाथ कोंबडी पालन **Kadaknath raring** | दोन दिवस, ०३ तास प्रती दिवस | साक्षर | रु. ८०० प्रती लाभार्थी | मूळ, गृहनिर्माण, व्यवस्थापन, बाह्यरूप, जीवनचक्र, कामगिरीची रूपरेषा , आजाराचे व्यवस्थापन, विविध आजार व उपाय , कृमी, औषधी आणि पौष्टिक गुणधर्म, उपकरने आणि त्यांची काळजी, पोषक वातावरण, विक्री व्यवस्था. |
| १९ | विष मुक्त जीवन पद्धती **Toxin free life style products** | दोन दिवस, ०३ तास प्रती दिवस | साक्षर | रु. ८०० प्रती लाभार्थी | हेअरवॉश (शिकेकाई, रिठा आणि इतर औषधी वनस्पती), बॉडीवॉश (उटणे). डेंटलकेअर( दंतमंजन औषधी वनस्पती एकत्रित करून तयार केलेले) ऑल परपज क्लिनर (व्हिनेगर), टॉयलेट क्लिनर (व्हिनेगर), नैसर्गिक लिक्विड सोप: रिठा पावडर/ रिठाबिया, शिकेकाई पावडर आणि व्हिनेगर, नैसर्गिक क्लिनींग पावडर रिठा, शिकेकाई आणि बेकिंग सोडा वापरून |

सही / -

**सभापती**

शहर सुधारणा समिती

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी – ४११ ०१८.